# मिरा भाईंदर महानगरपालिका

समाजविकास विभाग
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्यकार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), जि. ठाणे 401101
जा.क्र.मनपा/सविवि/922 /2020-21
दि.94 /03 /2021

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- जाहिर सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द् करणेबाबत.
संदर्भ :- मा. उप-आयुक्त सो. यांची दि.15/03/2021 रोजीची मंजुरी.

उपरोक्त् संदर्भिय विषयान्वये समाजविकास विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींना ई-ऑटो चे मोफत वितरण करण्यात येणार आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीकडुन अर्ज मागविणे करीता सोबत दिलेली जाहीर सुचना वृत्तपत्रात तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(दिपाली जोशी)
समाजविकास अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत
सिस्टिम मॅनेजर
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

d:\backup 11-09-2017\desktop\letter head 1.docx

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर(प.)
ता.जि.ठाणे 401105

## समाजविकास विभाग

दुरध्वनी क्रमांक 28192828/28193028/28181183 EXT-389

जा.क्र.मनपा/समवि/७२२/2020-21 दि.१५/०३/2021

## // जाहीर सुचना //

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्ती स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने दिव्यांगाना ई-ऑटो मोफत उपलब्ध करुन देणेबाबतची योजना राबवावयाची आहे. दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध् करुन रोजगार निर्मितीस चालना देणे, दिव्यांग व्यक्तीचे आर्थिक व सामाजिक पुर्नवसन करणे, सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार/कुटूंबासमावेत जीवन जगण्यास सक्षम करणे हा या योजनेचा उद्देश आहे. सदर योजनेचा लाभ दिव्यांगाना देण्याकरीता मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्य् करणाऱ्या दिव्यांग व्यक्तीकडुन खालील अटीशर्तीनुसार अर्ज मागविण्यांत येत आहेत.

1. दिव्यांग लाभार्थी हा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असावा. महानगरपालिका वासतव्या संबंधित 5 वर्षाचा पुरावा सादर करणे बंधनकार राहील.
2. लाभार्थ्यांकडे दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40 टक्के ते 70 टक्के असावे तसेच जिल्हा शल्य् चिकित्स्क/सक्षम प्राधिकारी, यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र धारक असावा.
3. लाभार्थी हा 18 ते 55 या वयोगटातील असलेबाबतचा पुरावा म्हणुन पॅनकार्ड.
4. लाभार्थ्यांचे आधार कार्ड.
5. दिव्यांग लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न् रु.2.50 लाख पेक्षा अधिक नसलेबाबतचा पुरावा म्हणुन उत्पन्नाचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.
6. अर्जाची छाननी झालेनंतर पात्र लाभार्थ्यांची निवड करतेवेळी अर्जदाराने सर्व अटी मान्य असल्याचे तसेच संबंधीत वाहनाची योग्य् ती काळजी घेण्याचे बंधपत्र रु.100/- च्या स्टॅम्पपेपरवर सादर करणे आवश्यक् राहील.

तरी सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता लाभार्थ्यांनी वरील अटी शर्ती नुसार सर्व कागदपत्रे साक्षांकित करुन बंद लिफाफ्यात समाजविकास विभाग, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छ. शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.) येथे दि.२९/०३/2021 स्वत: किंवा प्रतिनिधी मार्फत् पोहोच करावेत. अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त सो. यांचा राहील.

(अजित मुठे)
उप-आयुक्त
समाजविकास विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner